चांदा ते बांदा योजने अंतर्गत सन २०१९-२० साठी राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष मधील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन व प्रशासकीय खर्चाकरीता निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: चांबांयो-२०१९/प्र.क्र.५३/का.१४१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २३ एप्रिल, २०१९.

वाचा:

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि. २९.०६.२०१६.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१६/प्र.क्र.१८६/का.१४८१, दि. १८.११.२०१६.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९.

शासन निर्णय:

उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णय अन्वये चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होण्यासाठी सधन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यामध्ये चांदा ते बांदा या योजनेस शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये चांदा ते बांदा योजनेची उद्दीष्ट्ये, निवडण्यात आलेली विकास क्षेत्रे, कार्यक्रमाची अंमलबजावणी, प्रशासकीय खर्च आणि कार्यक्रमाचे संनियंत्रण व मूल्यमापन इ. बाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

२. संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णय दि.१८.११.२०१६ अन्वये सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी "राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" व "जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" स्थापन करण्यात आला आहे. "राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" मंत्रालय स्तरावर व "जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" जिल्हा स्तरावर कार्यरत राहणार आहे. राज्य व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये विविध संवर्गामध्ये पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदांमध्ये प्रकल्प संचालक, जिल्हा समन्वयक ही पदे प्रतिनियुक्तीने तर समन्वयक, युवा व्यावसायिक व कार्यालयीन सहायक ही पदे बाह्य यंत्रणेकडुन भरण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. राज्य व जिल्हा व्यवस्थापन कक्षासंबधात होणारा वेतन, प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च याकरिता निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

३. सन २०१९-२० या वित्तिय वर्षासाठी मागणी क्र. ओ-७, लेखाशिर्ष "३४५१-सचिवालय आर्थिक सेवा, ००, ०९०-सचिवालय, (०५) चांदा बांदा विशेष कार्यक्रम, (०५)(०१) चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यामध्ये साधन संपत्तीवर आधारीत सधन नियोजन व विकास कार्यक्रम राबविणे **(३४५१A०१९)**" या खाली ०१-वेतन, १०-कंत्राटी सेवा, ११-देशांतर्गत प्रवास व १३-कार्यालयीन खर्च या उद्दीष्टांसाठी खाली नमुद केल्यानुसार "कार्यासन अधिकारी, कार्यासन १४२२, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई," तसेच "जिल्हा नियोजन अधिकारी तथा नियंत्रक अधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग" यांना पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. **(रु.लाखात)**

अ. क्र.	उद्दीष्ट	एकूण चार महिन्याकरिता अंतरीम अर्थसंकल्पिय तरतूद	बीडीएसवरील उपलब्ध निधी (एप्रिल २०१९)	वितरीत करावयाचा निधी			
				कार्यासन १४२२, नियोजन विभाग	चंद्रपूर	सिंधुदुर्ग	एकूण
१	२	३	४	५	६	७	८
१	०१ वेतन	१५.१८०	७.५९०	४.५००	१.५४५	१.५४५	७.५९०
२	१०, कंत्राटी सेवा	१९.२१०	९.६१०	५.०००	२.३०५	२.३०५	९.६१०
३	११, देशांतर्गत प्रवास खर्च	१.०१०	०.५००	०.३००	०.१००	०.१००	०.५००
४	१३, कार्यालयीन खर्च	२.३४०	१.१७०	०.५००	०.३३५	०.३३५	१.१७०
	एकूण	**३७.७४०**	**१८.८७०**	**१०.३००**	**४.२८५**	**४.२८५**	**१८.८७०**

४. "जिल्हा नियोजन अधिकारी तथा नियंत्रक अधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग" यांनी सदरहू अनुदान "आहरण व संवितरण अधिकारी तथा सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग" यांना वितरीत करावे.

५. आहरण व संवितरण अधिकारी, "नियोजन विभाग (का.१४२२)" तसेच " सहायक जिल्हा नियोजन अधिकारी चंद्रपुर व सिंधुदुर्ग" यांनी मंजुर करण्यात आलेले अनुदान उद्दीष्टनिहाय व विहीत मर्यादेत खर्च करावे. त्याचप्रमाणे मंजुर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. या आदेशान्वये वाटप करण्यात येत असलेले अनुदान हे मासिक निधी विवरणपत्रानुसार (Cash Flow statement) करण्यात येत आहे.

७. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय, महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम-२०१९ निधी वितरण याविषयी वित्त विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९ मधील तरतूदी/ निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०४२३१४२९५४३३१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.04.24 13:06:59 +05'30'

(वि.फ.वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
३) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५) जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग.
६) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपुर व नवी मुंबई.
७) उपसचिव, कार्यासन १४२२ / १४२४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग.
९) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, चंद्रपुर व सिंधुदुर्ग.
१०) प्रकल्प संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) वित्त विभाग, अर्थ-१६, मंत्रालय, मुंबई,
१२) निवड नस्ती.